मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजना सन २०१९-२० मध्ये राबविण्यासाठी ₹ २४००.०० लक्ष(अक्षरी ₹ चोवीस कोटी फक्त) एवढा निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यास मान्यता. (लेखाशिर्ष-२४०१A७९१)

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्र. मुअप्र-२०१९/प्र.क्र.६९/९-अे,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २२ जुलै, २०१९

वाचा:- (१) शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र. राअअ-१११६/प्र.क्र.२४८/१४-अे, दि.२० जून, २०१७.
(२) शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र. कृप्रधो-२०१७/प्र.क्र.२०८/९-अे,दि.३१ ऑक्टोबर, २०१७
(३) शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र. कृराधो-१४१७/प्र.क्र.१०९/९-अे, दि.०६ जून, २०१८
(४) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.१ एप्रिल, २०१९
(५) शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र. मुअप्र-२०१९/प्र.क्र.६९/९-अे, दिनांक ३ जून, २०१८
(६) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि.०८ जूलै, २०१९

प्रस्तावना:-

राज्यातील अन्न प्रक्रिया उद्योगाला चालना देणे, शेतीमालाचे मुल्यवर्धन करणेकरिता शेतकऱ्यांच्या सहभागाद्वारे आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित प्रकल्प स्थापित करण्यास प्रोत्साहन देणे, उत्पादित अन्न पदार्थाच्या गुणवत्तेमध्ये वाढ व्हावी, उर्जेची बचत व्हावी यासाठीच्या प्रकल्पाच्या आधुनिकीकरणास प्रोत्साहन देणे या उद्दिष्टासह उपरोक्त वाचा येथील क्रमांक १ च्या शासन निर्णयान्वये राज्यामध्ये सन २०१७-१८ या आर्थिक वर्षापासून पुढील पाच वर्षासाठी "मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजना" ही १०० % राज्य पुरस्कृत योजना सुरु करण्यात आली आहे. तसेच क्रमांक २ येथील शासन निर्णयान्वये राज्याचे "अन्न प्रक्रिया धोरण-२०१७" जाहीर करण्यात आले असून क्रमांक ३ येथील शासन निर्णयान्वये राज्यामध्ये अन्न प्रक्रिया योजनेंतर्गत लघु, शुक्ष्म व मध्यम उद्योगांसाठी क्षेत्र मर्यादा विहीत करण्यात आली आहे.

सदर योजना सन २०१९-२० मध्ये राबविण्यासाठी उपरोक्त वाचा येथील ५ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सन २०१९-२० या चालू वर्षी सदर योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता लेखानुदानाद्वारे ₹ ४०००.०० लक्ष (अक्षरी ₹ चाळीस कोटी फक्त) इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. सदर अर्थसंकल्पीत निधीच्या ६० % च्या मर्यादेत निधी वितरित करण्याबाबत उपरोक्त वाचा येथील क्रमांक ६ च्या परिपत्रकान्वये वित्त विभागाने स्पष्ट केले आहे. सदर परिपत्रकान्वये स्पष्ट केल्यानुसार अर्थसंकल्पीत निधीच्या ६० % म्हणजे ₹२४००.०० लक्ष (अक्षरी ₹चोवीस कोटी फक्त) एवढा निधी आयुक्त (कृषी) यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर (BEAMS) वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे..

शासन निर्णय:-

१. सन २०१९-२० मध्ये "मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजना" या योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता अर्थसंकल्पीत केलेल्या ₹ ४०००.०० लक्ष रक्कमेपैकी ६० % म्हणजे ₹२४००.०० लक्ष (अक्षरी ₹ चोवीस कोटी फक्त) एवढा निधी आयुक्त (कृषी) यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर (BEAMS) उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

२. सदर निधी खालील लेखाशिर्षांतर्गत चालू वर्षी अर्थसंकल्पीत केलेल्या तरतूदीतून खर्ची टाकावा.
मागणी क्रमांक डी-३, २४०१- पिक संवर्धन,
(००) (१०२) अन्नधान्ये पिके,
(००) (३४) मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजना (१०० % राज्य योजना)
(२४०१A७९१)
३३, अर्थसहाय्य

३. सदर योजना राबविताना यापूर्वी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतूदी व मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

४. निधी खर्च करताना महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम पुस्तिका व वित्तीय अधिकार नियम पुस्तिकेमध्ये उल्लेख केलेल्या तसेच नियोजन व वित्त विभागाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना व प्रचलित अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करावे.

५. हा शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक: अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक १ एप्रिल, २०१९ व वित्त विभाग, परिपत्रक क्रमांक: अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दिनांक ८ जुलै, २०१९ मधील अटी व शर्तीचे अनुपालन करण्याच्या अटीच्या अधीन राहून प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०७२२११४५२२३४०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by Ashok Maroti Atram
Date: 2019.07.22 11:55:58 +05'30'

(अशोक आत्राम)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. मंत्री (रोजगार हमी व फलोत्पादन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
२) मा. मंत्री (कृषी) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२

३) मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई-३२
४) मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा, विधानमंडळ सचिवालय, मुंबई-३२
५) मा. राज्यमंत्री (कृषी व फलोत्पादन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
६) मा. सर्व विधानपरिषद/विधानसभा सदस्य, महाराष्ट्र राज्य.
७) अप्पर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
८) अप्पर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
९) सचिव (कृषी) यांचे वरीष्ठ स्वीय सहायक, कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१०) आयुक्त (कृषी), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
११) संचालक (कृषी प्रक्रिया व नियोजन), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२) सर्व विभागीय कृषी सह संचालक, महाराष्ट्र राज्य.
१३) सर्व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, महाराष्ट्र राज्य,
१४) महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परीक्षा) मुंबई/नागपूर.
१५) संचालक, लेखा व कोषगार अधिकारी, मुंबई (२ प्रती)
१६) सह संचालक, लेखा व कोषागारे (संगणक कक्ष), नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला, मुंबई-३२
१७) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
१८) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१९) निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
२०) माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२
२१) कार्यासन ९-अे, निवड नस्ती,